पिंपरी चिंचवड महानगरपालिका
मा.क्रिडा समिती
कार्यपत्रिका क्रमांक :- ४
सभावृत्तांत

दिनांक :- ०६ / ०६ / २०१२ वेळ :- दुपारी ४.०० वाजता

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा. क्रिडा समितीची पाक्षिक सभा बुधवार दिनांक - ०६/०६/२०१२ रोजी दुपारी ४.०० वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारती मधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा. सदस्य उपस्थित होते.

१) मा. थोरात वनिता एकनाथ - सभापती
२) मा. पांढरकर निलेश शंकरराव
३) मा. आसवाणी हिरानंद ऊर्फ डब्बू किमतराम
४) मा. भालेकर शांताराम कोंडिबा ऊर्फ एस.के.बापु
५) मा. काळभोर वैशाली जालिंदर
६) मा. बोकड रामदास गेणभाऊ
७) मा. अप्पा ऊर्फ संपत ज्ञानोबा पवार

याशिवाय मा.गायकवाड - सहा.आयुक्त, मा.चाकणकर - प्र.नगरसचिव, मा.पानसरे - क्रिडा अधिकारी हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

----------

उपस्थित सन्मा.सदस्यांचे संमतीप्रमाणे खालील ऐनवेळचे विषय सभा कामकाजात दाखल करुन घेणेत आले -

विषय क्रमांक १ :- कै. मधुकर पवळे व्यायामशाळा सेवाशुल्क तत्वावर चालविण्यास देणेबाबत -
मा. रामदास बोकड, मा. निलेश पांढरकर यांचा प्रस्ताव..

विषय क्रमांक २ :- कै.मुरलीधर माचुत्रे व्यायामशाळा सेवाशुल्क तत्वावर चालविण्यास देणेबाबत -
मा. निलेश पांढरकर, मा. शांताराम भालेकर यांचा प्रस्ताव..

विषय क्रमांक ३ :- दिनांक २३ जून रोजी ऑलिंपिक ज्योत रॅलीचे आयोजन करणेबाबत -
मा. शांताराम भालेकर, मा. निलेश पांढरकर यांचा प्रस्ताव..

----------

दिनांक १६/०५/२०१२ रोजी झालेल्या सभेचा (कार्यपत्रिका क्रमांक ३) सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा. सभापती यांनी प्रकट केले.

----------

<u>सभा कामकाजात दाखल करुन घेणेत आलेले विषय घेणेत आले -</u>

ठराव क्रमांक :- ९ विषय क्रमांक :- १
दिनांक :- ०६/०६/२०१२
सुचक :- मा. रामदास बोकड अनुमोदक :- मा. निलेश पांढरकर
संदर्भ :- मा. रामदास बोकड, मा. निलेश पांढरकर यांचा प्रस्ताव -

म.न.पा.ची कै. मधुकर पवळे व्यायाम शाळा, यमुनानगर निगडी ही व्यायाम शाळा सुवर्णयुग मित्र मंडळ, यमुनानगर, निगडी पुणे - ४४ या संस्थेस द.म.सेवाशुल्क रक्कम रु.२,०००/- मनपा कडून घेऊन ११ महिने कराराने सेवाशुल्क तत्वावर चालविण्यास देणेस मान्यता देणेकामी मा.स्थायी समितीकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पहाता ठराव मा.स्थायी समितीकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक :- १० विषय क्रमांक :- २
दिनांक :- ०६/०६/२०१२
सुचक :- मा. निलेश पांढरकर अनुमोदक :- मा.शांताराम भालेकर
संदर्भ :- मा. निलेश पांढरकर, मा.शांताराम भालेकर यांचा प्रस्ताव -

पिंपरी चिंचवड म.न.पा.च्या वतीने म.न.पा. परिसरात नागरिकांसाठी एकूण ७३ व्यायामशाळा चालू केलेल्या आहेत. त्यापैकी कै. मुरलीधर माचुत्रे व्यायामशाळा चिंचवड पुणे ३३ ही व्यायामशाळा, जय मातृभूमी युवा मंच चिंचवड पुणे ३३ ही संस्था ११ महिने कराराने दरमहा सेवाशुल्क र.रु.२,०००/- म.न.पा.कडून घेऊन सेवाशुल्क तत्वावर चालविणेस तयार आहेत. तरी कै.मुरलीधर माचुत्रे व्यायामशाळा चिंचवड पुणे ३३ ही व्यायामशाळा, जय मातृभूमी युवा मंच चिंचवड पुणे ३३ या संस्थेस ११ महिने कराराने दरमहा सेवाशुल्क र.रु.२,०००/- म.न.पा.कडून घेऊन सेवाशुल्क तत्वावर चालविणेस देणेस मान्यता देणेकामी मा.स्थायी समितीकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठराव मा.स्थायी समितीकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक :- ११ विषय क्रमांक :- ३
दिनांक :- ०६/०६/२०१२
सुचक :- मा. मा.शांताराम भालेकर अनुमोदक :- मा. निलेश पांढरकर,
संदर्भ :- मा. शांताराम भालेकर, मा. निलेश पांढरकर यांचा प्रस्ताव -

दिनांक २३ जून रोजी जागतिक ऑलिंपिक दिन जगभरात मोठया प्रमाणात साजरा केला जातो. सन २०१२ च्या ऑलिंपिक स्पर्धा इंग्लड यंथे आयोजित करण्यात येत आहेत. पिंपरी चिंचवड शहरामध्ये विविध क्रिडा प्रकारामध्ये खेळाडू पिंपरी चिंचवड शहराचा नावलौकीक वाढवित आहे. जागतिक ऑलिंपिक दिन व यावर्षी होणा-या ऑलिंपिक स्पर्धेची जनजागृती पिंपरी चिंचवड शहरातील नागरिकांमध्ये होण्याच्या दृष्टीने म.न.पा.च्या वतीने दि. २३ जून रोजी जागतिक ऑलिंपिक दिना निमित्त ऑलिंपिक ज्योत रॅलीचे आयोजन करण्यात येणार आहे. तरी जागतिक ऑलिंपिक दिन

व यावर्षी होणा-या ऑलिंपिक स्पर्धेची जनजागृती पिंपरी चिंचवड शहरातील नागरिकांमध्ये होण्याच्या दृष्टीने म.न.पा.च्या वतीने दि.२३ जून रोजी ऑलिंपिंक ज्योत रॅलिचे आयोजनाकामी येणा-या प्रत्यक्ष खर्चास मान्यता देणेकामी मा.स्थायी समितीकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठराव मा.स्थायी समितीकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

यानंतर मा.सभापती यांनी सभा संपल्याचे जाहीर केले.

**[ थोरात वनिता एकनाथ ]**
सभापती
क्रिडा समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी- ४११ ०१८

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी- ४११ ०१८, नगरसचिव कार्यालय
क्रमांक :- नस/४/कावि/८७८/२०१२
दिनांक :- ०७/०६/२०१२ चे लगत

प्र. नगरसचिव
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी- ४११ ०१८

प्रत : सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांचेकडे
पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.